प्रेस नोट दिनांक - २१/०६/२०१९

---

**गुन्हे शाखा युनिट – ३ यांचेकडुन निलेश वाडकर खुन प्रकरणातील मोक्यातील फरार गुंड गजाआड**

---

दिनांक - १३/०१/१९ रोजी सायंकाळी - १८/०० वा चे सुमारास खुडे निवास गल्ली नंबर ३ जयभवानी नगर जनता वसाहत पुणे याठिकाणी निलेश शिवाजी कदम वय-२८ रा-गल्ली नंबर ३५ जनता वसाहत पर्वती पुणे व त्यांचा मित्र निलेश संभाजी वाडकर वय-३४ रा-विठठल मंदीर जवळ जनता वसाहत व इतर पायी जात असताना सुनिल डोकेफोडे ऊर्फ चॉकलेट सुन्या रा – जनता वसाहत व त्याचे इतर साथीदार यांनी निलेश वाडकर हा हप्ते वसुलीस विरोध करतो तसेच पुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरुन मनात राग धरुन सुनिल डोकेफोडे ऊर्फ चॉकलेट सुन्या व त्याचे इतर साथीदार यांनी पुर्व नियोजित कट करुन गैरकायदयाची मंडळी जमा करुन गावठी पिस्तोल मधुन निलेश वाडकर याचेवर फायरिंग करुन तसेच धारदार कोयत्याने वार करुन त्याचा खुन केला आहे. सदरबाबत निलेश शिवाजी कदम वय-२८ रा – जनता वसाहत पर्वती पुणे यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे. सदरबाबत **दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे गु र नं – ७५/२०१९ भा दं वि कलम ३०२, ३०७, ३२४, १४७, १४८, १४९, १२०(ब), भारताचा हत्याराबाबतचा कायदा कलम ३ (२५), ४ (२५) क्रिमिनल लॉ अॅमेंडमेंट अॅक्ट कलम ७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३ (१) (I) (II), ३ (२), ३ (४) चा समावेश करण्यात आलेला आहे.**

सदर गुन्हयामध्ये यापुर्वी आरोपीनामे १) योगेश राजेंद्र जांभळे वय-२६ रा-जनता वसाहत पर्वती पुणे २) अभिजित गणेश कडु वय-२६ रा-सदर ३) सौरभ रावसाहेब आढाव वय-१९ रा - सदर ४) राज उर्फ राजेश रावसाहेब आढाव वय-२० रा-सदर ५) शुभम एकनाथ खाडे वय-२१ रा -सदर ६) अतिश सतिश माळी वय-१९ रा-सदर ७) सतिश शाम माळी वय-४० रा-सदर ८) नवनाथ सुर्यकांत ऊर्फ बाळासाहेब वाल्हेकर वय-३० रा - सदर ९) दिपक शेंडी ऊर्फ दिपक दत्तात्रय खिरीड वय-३१ रा-गो-हे बु ता - हवेली जिल्हा पुणे १०) अक्षय हरिभाऊ आंबवले वय-२१ रा-सदर ११)अभिजित राम कदम वय-२१ रा- जनता वसाहत पुणे १२)भिमराज राजु कांबळे वय-१८ रा-जयभवानी नगर पर्वती पुणे १३) सुरज बबन कोळगे वय-२३ रा-सदर १४)योगेश ऊर्फ नुन्या शशिकांत पवार वय-२७ रा-सदर १५) श्रावण काशीनाथ सावगावे वय-२२ रा - सदर १६) अविनाश ऊर्फ गौरव सुनिल देवकुळे वय-२४ रा -सदर असे एकुण सोळा आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. **गुन्हयातील मुख्य आरोपी १)सुनिल किशोर डोकेफोडे ऊर्फ चॉकलेट सुन्या २) नितीन मेटकरी ३)समीर ऊर्फ काळादादया नाटेकर हे गुन्हा घडल्यापासुन फरार आहेत त्यांचा पोलीस शोध घेत आहेत.**

दिनांक – २१/०६/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ पुणे कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे एक पथक फरारी आरोपींचा शोध घेत होते. त्यावेळी पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर व संदीप तळेकर यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की फरारी आरोपी समीर नाटेकर हा शिवाजी नगर कोर्ट पुणे येथे अटक पुर्व जामीन मिळवण्यासाठी येणार आहे. अशी खात्रीशीर माहीती मिळाल्यावरुन पोलीसांनी शिवाजीनगर कोर्ट परिसरात सापळा लावुन संशयीत आरोपी समीर ऊर्फ काळादादया राऊत नाटेकर वय-२५ रा – गल्ली नं - ७ घर नं ४९ जनता वसाहत पर्वती पुणे हल्ली रा - सोमाटणे फाटा ता - मावळ जिल्हा पुणे यास पकडले आहे. त्यास पुढील कारवाईसाठी दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. **मा. अे. वाय. थत्ते सो विशेष न्यायाधिश मोका न्यायालय शिवाजी नगर पुणे यांचे न्यायालयात आरोपीस हजर केले असता त्यांनी आरोपीस दिनांक - २८/०६/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. आरोपीविरुध्द यापुर्वी दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे येथे खुनाचा एक, खुनाचा प्रयत्न एक, गंभीर दुखापत एक असे तीन गुन्हे दाखल आहेत.**

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे व पथकातील पोलीस कर्मचारी सपोफौ अनिल शिंदे, संतोष क्षीरसागर, प्रविण तापकीर, संदीप तळेकर, संदीप राठोड, राहुल घाडगे, दत्तात्रय गरुड, शकील शेख, रणजित अभंगे व सुजित पवार यांनी केली आहे.

## प्रेस नोट दिनांक - २१/०६/२०१९

### अटक टाळण्यासाठी पाच वर्षापासुन पोलीसां पासुन लपलेला फरार आरोपी जेरबंद

दिनांक – १२/१०/२०१० रोजी श्री विश्वनाथ महादेव साबळे वय-३९ रा-सनं ६५०/१ विघ्नहार नगर बिबवेवाडी पुणे यांनी घटनेबाबत पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे. सन २०१० सालामध्ये त्यांनी त्यांचे व्यवसायासाठी आरोपी कृष्णा ईश्वरसिंग दुधानी वय - ३५ रा - नुराणी मशिदजवळ गुलटेकडी डायसप्लॉट पुणे याचेकडुन पाच लाख रुपये हात उसने घेतले होते . त्यावेळी तारण म्हणुन फिर्यादी यांनी त्यांचे विघ्नहार नगर बिबवेवाडी पुणे येथील राहते घराचे खरेदीखत आरोपीचे नावाने केले होते. सन २०११ मध्ये फिर्यादी यांनी घेतलेले सर्व पैसे परत दिले व आरोपीस तारण म्हणुन करुन दिलेले खरेदीखत रदद करुन देण्याची मागणी केली परंतु आरोपी याने खरेदीखत देण्यास टाळाटाळ केली . त्यानंतर दिनांक – १२/१०/२०१४ रोजी फिर्यादी हे घरी असताना कृष्णा दुधानी व त्याचे साथीदार ईश्वरसिंग दुधाणी , विलास गवळी , तेजोकौर दुधाणी , गोपीकौर दुधाणी , सुलतानाकोर दुधाणी यांनी फिर्यादी यांचे घरात अनधिकाराने प्रवेश करुन त्यांना तलवारीचा धाक दाखवुन शिवीगाळ मारहाण करुन घरातील सामान बाहेर फेकुन खिडक्यांचा काचा फोडुन नुकसान केले आहे त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे सदरबाबत बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे गु र नं – १३२/२०१४ भा दं वि कलम १४३, १४७, १४९, ४४८, ४५२, ५०६ (२) , ४२७, ३२३, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयामध्ये यापुर्वी आरोपीनामे १) कृष्णासिंग ईश्वरसिंग दुधाणी वय-३५ रा- नुराणी मशिदजवळ गुलटेकडी डायसप्लॉट पुणे २)विलास व्हाळप्पा गवळी वय-३० रा - सदर यांना अटक करण्यात आलेली आहे. महिला आरोपी तेजोकौर दुधाणी, गोपीकौर दुधाणी, सुलतानाकोर दुधाणी यांना अटकपुर्व जामीन मंजुर झालेला आहे. गुन्हयातील आरोपी ईश्वरसिंग दुधाणी हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता तो पोलीसांना मिळुन येत नव्हता त्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

दिनांक – २१/०६/२०१९ रोजी गुन्हे शाखा युनिट ३ पुणे कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी पाहीजे व फरारी आरोपींचा शोध घेत असताना पोलीस कर्मचारी कैलास सांळुखे व नितीन रावळ यांना मिळालेल्या बातमीवरुन पोलीसांनी डायस प्लॉट गुलटेकडी पुणे येथे सापळा लावुन संशयीत आरोपी ईश्वरसिंग धवलसिंग दुधाणी वय-७८ रा – ४२९/४३० डायस प्लॉट झोपडपटटी पुणे यास पकडले आहे व त्यास पुढील कारवाईसाठी बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, किरण अडागळे व पथकातील पोलीस कर्मचारी सपोफौ दिपक मते, संतोष क्षीरसागर, कैलास सांळुखे, नितीन रावळ, गजानन गानबोट, यांनी केली आहे.